RTE Point 1 157

# कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर

4

नमुना दोन

ग्राम : नागपूर शहर
दुरध्वनी :- 0712-2560902
ई मेल :- ss.nagpur1@yahoo.co.in

जावक क्र: जिपना/शिवि/प्राथ./RTE/शा.मा./ 5945 /2020
कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर
विभाग - नागपूर, राज्य - महाराष्ट्र.
दिनांक : 21/09/2020

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
भाऊसाहेब मुळीक चॅरीटेबल ट्रस्ट,नागपूर.

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 मधील पोट-नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपल्या दिनांक 13.08.2020 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे मी चिंतामण वंजारी,शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद नागपूर, दिनांक 01.04.2019 ते 31.03.2022 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ते 8 करीता के.डी.के.इंटरनॅशनल स्कुल, बुटीबोरी, जि. नागपूर या शाळेस तात्पुरती मान्यता प्रमाणपत्र देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2. बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 ( जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 ( जोडपत्र दोन ) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.

3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25 % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणाचे अनुपालन करण्यात येईल.

4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकांना भाग पाडणार नाही.

6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

7.(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तिन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

...ा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या ...
...ांना प्रवेश देईल.

शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मान्यता ...
...णीच्या वेळेत शाळेत उपलब्ध सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - 22050 चौ.मी.
- एकूण बांधकाम क्षेत्र -. 4120.014 चौ.मी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ -. 16500 चौ.मी.
- वर्गखोल्यांची संख्या – 18
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली - आहे.
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधान गृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. - आहे.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - नळ व शुध्द पिण्याचे पाणी सोय आहे.
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर- लागू नाही.
- अध्यापन-अध्यापन साहित्य/ खेळ व क्रीडा विषयक सामुग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता - आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध – पुस्तके उपलब्ध आहेत.
- सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत काय?- आहे.
- शाळेला संरक्षण भिंत आहे काय?- आहे.

11. मान्यता नसलेल्या वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणत्याही नफा मिळविण्याकरीता चालविण्यात येत नाही.

15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पाठविण्यात यावी.

16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक 27090902941 असा आहे,हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे..

18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नुतनीकरण असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

19. शासनाचे ध्येयधोरणानुसार शाळेतील कार्यरत मुख्याध्यापक तसेच शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वैयक्तीक मान्यता शिक्षण विभागाकडून घेणे आवश्यक राहील.

20. बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 प्रमाणे शाळेला आवश्यक असणा-या उपरोक्त त्रुटींची पुर्तता दिनांक 31.03.2022 पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात. *अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.*

(शिक्षणाधिकारी)

Scanned with OKEN Scanner

क्र.जिपना/शिक्षण/प्राथ/मान्यता/का.क्र.२५/ 652 /२०
कार्यालय जिल्हा परिषद नागपूर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक :- 27 / 01 / 2020

प्रति

अध्यक्ष/सचिव
भाऊसाहेब मुळीक चॅरीटेबल ट्रस्ट,
नागपूर .

विषयः- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वंय अर्थसहाय्यीत तत्वावर सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा स्थापन करणे करीता प्रथम खाते मान्यता परवानगी देणेबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १, ६ व २४) २०१२.

२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१९/ प्र.क्र.१०१८ एसएम-२, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९.

३) मा.शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर,यांचे कार्यालयील पत्र क्र.माध्य/ब/स्वअर्थ/१०५१३/२०१९. दिनांक ०९ डिसेंबर, २०१९.

वरील विषयी आपणास कळविण्यात येतं की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणे/ विद्यमान शाळचा दर्जावाढ करणें करीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणे करीत मान्यता देण्यात आलेली असून या कार्यालयमार्फत खालील नमुद शाळेला खालील अटी व शर्तीवर नवीन शाळा प्रथम खाते मान्यतेची परवानगी देण्यांत येत आहे.

| अ क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव व पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मंडळ संलग्न | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | भाऊसाहेब मुळीक चॅरीटेबल ट्रस्ट, नागपूर | के. डी. के. इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट नं.पी-७३, आर ॲन्ड सी झोन एम.आय.डी.सी. बुट्टीबोरी, जिल्हा नागपूर | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) | सी.बी एस.ई. मंडळ | सन २०१९-२० पासुन |

अटी व शर्ती

१) सदर शाळेने बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व या अंतर्गत केलेल व करण्यात सर्व नियमांची/तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

Principal
K.D.K. International School
Butibori Nagpur

२) संस्थेने सदर शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अमलबजावनी करणे आवश्यक आहे.

३) एका मुलासाठी एका वर्षासाठीचे शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार निर्धारीत केलेले असावे.

४) संस्था किंवा शाळेबाबत आर्थिक अनियमिततेचे अथवा अधिनियमतीलतेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

५) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा १) मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे , त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करीता <u>स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/वर्ग</u> असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणा-या पत्रव्यवहारावर स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियम या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना यू-डायस मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१०) परवानगी दिलेल्या स्वयं अर्थसहाय्यीत शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी. तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची खात्याची वैयक्तिक मान्यता घेणे बंधनकारक राहील.

शासनाने सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(चिंतामण वंजारी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

<u>प्रतिलीपी</u>

१) मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा.शिक्षण संचालक (प्राथ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) मा.शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग , नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

४) मुख्याध्यापक, के. डी. के. इंटरनॅशनल स्कुल, प्लॉट नं.पी-७३, आर अँन्ड सी झोन एम.आय.डी.सी.,बुट्टीबोरी, जिल्हा नागपूर यांना माहितीस

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

Principal
K.D.K. International School
Butibori Nagpur

Scanned with OKEN Scanner